ePaper

द्धव ठाकरेंची मोठी खेळी, भाजपचा युवा नेता फोडला; रवींद्र चव्हाणांना मोठा धक्का

| वर्ष - 9 | अंक -90 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- इराणच्या आव्हानास सज्ज
- गिल एकदिवसीय मालिकेलाही मुकणार?
- ट्रम्प यांच्याकडून ममदानींची स्तुती
- उत्तर प्रदेशात घुसखोरांसाठी बंदिगृहे


www.mahaenews.com | रविवार, दि. 23 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### भाजप नेत्यांचा दबाव | सूसमधील बायो-सीएनजी प्रकल्प ठप्प

# पुणे महापालिकेला बसला तबब्ल 2 कोटी 81 लाखांचा दंड!

## वर्षभर प्रकल्प बंद ठेवल्याची किंमत करदात्यांना; स्थायी समितीकडून नुकसानभरपाई मंजूर

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राजकीय हस्तक्षेप आणि प्रशासनातील अनिर्णयामुळे पुणे महापालिकेच्या सूस येथील बायो-सीएनजी प्रकल्पाला बळजबरीने बंद ठेवण्यात आल्यामुळे अखेर महापालिकेला तब्बल २ कोटी ८१ लाखांची नुकसानभरपाई देण्याची वेळ आली आहे. स्थायी समितीने नुकतीच या रकमेची मंजुरी दिल्याने या कारवाईवरून महापालिकेत मोठी चर्चा रंगली आहे. “हा निर्णय नागरिकांसाठी होता की राजकारणासाठी?” असा सवाल आता पुढे आला आहे.**



**प्रकल्प बंद करण्यामागे ‘राजकीय दबाव’?**

सूस परिसरातील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायो-सीएनजी निर्मिती करण्याचा प्रकल्प पुणे महापालिकेने सुरू केला होता. हा प्रकल्प नोबल एक्स्चेंज एन्व्हायरो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडे चालविण्यासाठी देण्यात आला होता.

कार्यवाहीदरम्यान दुर्गंधीच्या तक्रारींमुळे स्थानिकांनी आंदोलन केले आणि त्यानंतर भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने प्रशासनाला प्रकल्प तत्काळ बंद ठेवण्याचे आदेश दिले, असा आरोप दस्ताऐवजांमध्ये स्पष्ट आहे. याच आदेशांनंतर प्रकल्प जानेवारी २०२४ ते जून २०२५ या कालावधीत बंद ठेवण्यात आला.

**न्यायालयाने दिल्या सूचना — पण राजकीय हट्ट कायम**

नागरिकांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर न्यायालयाने महापालिकेला दुर्गंधी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यास स्पष्ट सूचना दिल्या. परंतु, न्यायालयाच्या निर्णयानंतरही राजकीय इच्छाशक्ती नसल्याने प्रकल्प सुरू करण्याची प्रक्रिया पुढे सरकली नाही. तत्कालीन स्थितीवर स्थायी समितीच्या बैठकीत एका अधिकाऱ्याने सांगितलेला वादग्रस्त संवाद आता चर्चेत आहे. “प्रकल्प सुरू करण्याचा प्रयत्न केलात तर मी खुर्ची टाकून इथेच बसतो!” या धमकीनंतर प्रशासनाने प्रकल्प पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्नच केला नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बैठकीत दिली.

**ठेकेदाराची नुकसानभरपाई मागणी**

प्रकल्प बंद असल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे कारण देत ठेकेदार कंपनीने महापालिकेकडे सुरुवातीला ६ ते ७ कोटी रुपयांची भरपाई मागितली.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी चौकशी समिती नेमली. यामध्ये दोष प्रशासनाचा नसून प्रकल्प थांबवण्याचा निर्णय राजकीय आदेशावर घेतला गेला, असा निष्कर्ष नोंदवण्यात आला.

चौकशी अहवालानंतर नुकसानभरपाई २ कोटी ८१ लाखांवर निश्चित करण्यात आली आणि ती रक्कम ठेकेदाराला देण्याचा प्रस्ताव मंजूर झाला.

**निवडणूक वर्ष — आणि ‘विवश प्रशासन’**

महापालिकेतील घनकचरा विभागाने बैठकीत स्पष्ट केले की लोकसभा व विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सत्ताधाऱ्यांनी परिसरात अप्रिय परिस्थिती किंवा जनक्षोभ टाळण्यासाठी प्रकल्पाच्या क्षमतेत वाढ करण्यास पूर्णपणे आडकाठी केली. परिणामी, प्रकल्प फक्त “कागदोपत्री सुरू” राहिला आणि प्रत्यक्षात बंदच होता.

**हा प्रशासकीय अपयश की राजकीय स्वार्थ?**

या प्रकरणामुळे महापालिकेला फटका बसला आणि या रकमेतून शेवटी बोजा पडणार आहे तो पुणेकर करदात्यांवर.

**नगरविकास तज्ञांचे म्हणणे आहे**

“नियमांचे पालन, तांत्रिक सुधारणा आणि नागरिक संभाषणाच्या प्रक्रियेला वळसा घालून केवळ राजकीय आदेशावर प्रकल्प थांबवला गेला. हा प्रकार चांगल्या शहरी शासकीय व्यवस्थेचा पराभव आहे.” स्थायी समितीने हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर आता तो महापौर आणि महानगरपालिका प्रशासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे. दरम्यान, विरोधकांनी या निर्णयावर जोरदार टीका करत “हे शासन नव्हे, तर ठेकेदारांचे राज्य” अशी प्रतिक्रिया दिली आहे.

सूस येथील बायो-सीएनजी प्रकल्पाच्या बंदीने पर्यावरणीय, आर्थिक आणि प्रशासकीय पातळीवर मोठे नुकसान झाले आहे.

## महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीचा निर्णय: तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकावी

# हिंदी शिकण्यासाठी पालकांना आवाहन

## चांगली तयारी करून घेण्याच्या दृष्टीनेही उपक्रम



। पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतीय जनता पक्षाच्या खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झालेल्या महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या अनौपचारिक बैठकीत, शालेय अभ्यासक्रमात तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकावी, यासाठी आता पालकांनाही आवाहन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे, हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी हिंदी शिकविणाऱ्या शिक्षकांची भाषा शिकविण्याची चांगली तयारी करून घेण्याच्या दृष्टीनेही उपक्रम आयोजिण्यात येतील, असे या बैठकीत ठरले.**

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने नेमलेल्या त्रिभाषा सूत्र समितीच्या आतापर्यंतच्या जनसंवादांत शालेय अभ्यासक्रमात इयत्ता पहिलीपासून हिंदीसह तिसऱ्या भाषेच्या समावेशास विरोध होत आहे. त्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीने मुलांनी हिंदी शिकावी, यासाठी आता पालकांनाच आवाहन करण्याची भूमिका घेतली आहे.डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, 'त्रिभाषा सूत्र समितीच्या पुण्यात झालेल्या बैठकीत मी मुद्दा मांडला होता, की पहिलीपासून आपण इंग्रजी शिकू शकतो, तर हिंदीला का विरोध आहे? उलट लहानपणापासून बहुभाषिक दृष्टिकोन ठेवला, तर शून्य ते सहा वर्षे वयोगटात विषय आत्मसात करण्याची क्षमता जास्त असल्याने त्याचा फायदा होऊ शकतो. शासनाचा याबाबत जो निर्णय होईल, तो होईल, पण जे हिंदी शिकवले जाईल, ते चांगले असावे. म्हणून हिंदी शिक्षकांची तयारी, मुलांना हिंदी साहित्याची ओळख असे उपक्रम योजण्याचा समितीचा विचार आहे.''विभागीय स्तरावर काम करणाऱ्या राष्ट्रभाषा प्रचार समित्यांची आम्ही एक बैठक घेणार आहोत. त्यामध्ये तज्ज्ञांनाही बोलावू आणि त्यामध्ये जे काही सुचविले जाईल, त्याचे निवेदनही आम्ही त्रिभाषा सूत्र समितीला देऊ,' असेही कुलकर्णी यांनी नमूद केले. समितीच्या पुण्यातील वास्तूचे नूतनीकरण, समितीकडे असलेली पुस्तके वाचकांना उपलब्ध करून देणे, परिसंवाद, व्याख्याने आयोजिण्यासाठी सभागृहाचे नूतनीकरण, विद्यार्थी-पालकांसाठी हिंदी प्रचार-प्रसाराचे उपक्रम, परीक्षांचे नियोजन याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.वयाच्या ९५ व्या वर्षीही कार्यरत असलेले महाराष्ट्र राष्ट्रभाषा समितीचे संचालक ज. गं. फगरे यांची कुलकर्णी यांनी शनिवारी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान ही अनौपचारिक बैठक झाली. समितीचे उपाध्यक्ष सदानंद महाजन, कोषाध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, माधव माटे, संजय लेले आणि संजय भारद्वाज या वेळी उपस्थित होते. 'कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसार, राज्यामध्ये त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी होत आहे. ही बाब ध्यानात घेऊन शक्य आहे, विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावी, अशी विनंती पालकांना करण्यात येणार आहे. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी धोरण सुनिश्चितीसाठी जनतेच्या अपेक्षा मागविल्या आहेत. त्यांचे हे आवाहन नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून, त्यात हिंदी भाषा शिकण्यासाठी नागरिकांनी सकारात्मकता दर्शवावी, यासाठी समिती प्रयत्न करील,' अशी माहिती कोषाध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे यांनी दिली. भारतीय जनता पक्षाच्या खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झालेल्या महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या अनौपचारिक बैठकीत, शालेय अभ्यासक्रमात तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकावी, यासाठी आता पालकांनाही आवाहन करण्याचा भाषा शिकविण्याची चांगली तयारी असे या बैठकीत ठरले.ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने नेमलेल्या त्रिभाषा सूत्र समितीच्या आतापर्यंतच्या जनसंवादांत शालेय अभ्यासक्रमात इयत्ता पहिलीपासून हिंदीसह तिसऱ्या भाषेच्या समावेशास विरोध होत आहे.

### पालकांना साकडे घालण्याचा निर्णय

आता पालकांनाच आवाहन करण्याची भूमिका घेतली आहे.डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, 'त्रिभाषा सूत्र समितीच्या पुण्यात झालेल्या बैठकीत मी मुद्दा मांडला होता, की पहिलीपासून आपण इंग्रजी शिकू शकतो, तर हिंदीला का विरोध आहे? उलट लहानपणापासून बहुभाषिक दृष्टिकोन ठेवला, तर शून्य ते सहा वर्षे वयोगटात विषय आत्मसात करण्याची क्षमता जास्त असल्याने त्याचा फायदा होऊ शकतो. शासनाचा याबाबत जो निर्णय होईल.

# पवना धरणातील दारूभट्या उदध्वस्त

## एका बड्या नेत्याचा रिसॉर्ट फार्महाऊसही जमिनदोस्त




। पुणे ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**जिल्ह्यातील खडकवासला पवना धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील बेकायदा दारूभट्यांसह, एका बड्या नेत्याच्या नातेवाईकाने उभारलेल्या २० गुंठे जागेवरील रिसॉर्टसह फार्महाऊस जमिनदोस्त करण्यात आले आहे.धमक्या आणि राजकीय दबावाला बळी न पडता जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने ही कारवाई केली आहे.**

दरम्यान खडकवासला पानशेत वरसगाव कासारसाई पवना या जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील किमान ३०० अतिक्रमणे आणि बेकायदा बांधकामे हटविण्यात आली आहेत.पुणे आणि पिंपरी चिचवड शहरातील धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली आहेत. या परिसरात रिसॉर्ट, फार्महाऊस बांधण्यात आले आहेत. ही सर्व बांधकामे अनाधिकृत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी अनेक नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. मात्र कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही धरण परिसरातील अतिक्रमणे आणि अनाधिकृत बांधकामाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संदर्भात कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानतर गेल्या काही दिवसापासून धरण बाण कोट परिसरात कारवाई सुरू झाली. ही कारवाई रोखण्यासाठी राजकीय दबाव जिल्हा प्रशासनासह जलसंपदा विभागावर होती. खडकवासला धरण परिसरातील एका भागात स्वतःच्या मालकीची १२ गुंठे जमीन असताना एका बड्या नेत्याच्या नातेवाईकाने ३२ गुंठे जागेवर रिसॉर्ट उभारले होते.

### ३२ गुंठे जागेवर रिसॉर्ट

ते उभारताना वीस गुंठे जमिनीवर अतिक्रमण केल्याची तक्रार होती. त्यानुसार हे अतिक्रमण जमिनदोस्त करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. तसेच तीस वर्षांपासून असलेल्या दारूभट्ट्या ही उद्ध्वस्त करण्यात आल्या. दरम्यान खडकवासला धरण परिसरातील सुमारे १०० अतिक्रमणांवर पानशेतमध्ये ३०, पवनातील १२, वरसगाव येथील पाच अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच हिंगणे, स्वारगेट, वडगाव बुद्रुक, हडपसर, नीरा उजवा कालवा या भागातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.

## पिंपरी-चिंचवड निवडणूक | निर्णय स्थानिक कोअर कमिटीवर–रवींद्र चव्हाण

# भाजप ‘स्वबळावर’ लढणार की युतीसोबत?

### ‘बूथवर ५१ टक्के मतांची लढाई जिंकायची असेल तर डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि पायाला भिंगरी लागलीच पाहिजे’

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या आगामी निवडणुकीत भाजप स्वबळावर लढणार की महायुतीसोबत, यावर राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू असताना या प्रश्नावर अखेर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत. निवडणुकीचा निर्णय स्थानिक पातळीवरील कोअर कमिटी घेईल आणि त्यानंतर तो प्रस्ताव पुढे नेतृत्वाकडे पाठवला जाईल. अंतिम भूमिकेचा निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल, असे चव्हाण यांनी जाहीर केले.**



शनिवारी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पिंपरी-चिंचवड शहर भाजपचा भव्य कार्यकर्ता मेळावा पार पडला. मेळाव्यात शहरभरातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक अरुण टाक यांनी भाजपमध्ये प्रवेश करून पक्षाची ताकद वाढवली. कार्यकर्त्यांच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले.

मेळाव्याला प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, माजी आमदार उमा खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**“भाजपचा अजेंडा राष्ट्रहिताचा, बाकी पक्षांकडे अजेंडा नाही”**

यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, “भाजपचा कार्यकर्ता हा केवळ पक्षासाठी नाही तर राष्ट्रवादी विचारांसाठी काम करणारा योद्धा आहे. जगातील सर्वात मोठी राजकीय संघटना असलेला भाजप आज जागतिक पातळीवर ओळखला जातो आणि त्यामागे विचारधारा, राष्ट्रवाद आणि कार्यकर्त्यांची निष्ठा आहे.”

ते पुढे म्हणाले, “काही पक्षांकडे फक्त पारिवारिक अजेंडा आहे, पण भाजपचा अजेंडा राष्ट्रहिताचा आहे. भारत माता की जय, वंदे मातरम, आणि संविधानाचा आत्मा हे फक्त घोषवाक्य नाहीत, तर ते विचार आहेत. आमचे उमेदवार हे विचार घेऊन महापालिकेत पोहोचले पाहिजेत.”

**“बूथ जिंकलात म्हणजे निवडणूक जिंकली” – ५१ टक्के रणनिती**

आगामी निवडणुकीत बूथ व्यवस्थापनावर विशेष भर देण्याची गरज आहे, असे सांगत त्यांनी स्पष्ट केले—“बूथवर ५१ टक्के मतांची लढाई जिंकायची आहे. यासाठी डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि पायाला भिंगरी लावून काम करणारा कार्यकर्ता भाजपला हवा.”

त्यांनी पिंपरी-चिंचवडचा निवडणूक निकाल हा महाराष्ट्रातील भविष्यातील राजकीय दिशा ठरवणारा निकाल ठरेल, असेही सांगितले.

**अरुण टाक यांचा पक्ष प्रवेश – शक्तीप्रदर्शनाचा ठसा**

मेळाव्यात अरुण टाक यांचा भाजपत प्रवेश हा महापालिका निवडणुकीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या प्रवेशामुळे स्थानिक स्तरावर समीकरणे बदलण्याची शक्यता असल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

### कार्यकर्ते सज्ज, धोरणाची दिशा निश्चित

भाजपच्या रणनीतीचे संकेत देत चव्हाण म्हणाले — “निवडणूक ही केवळ सत्ता मिळवण्यासाठी नाही, तर राष्ट्रवादी विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप पुन्हा मजबूत विजय मिळवेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.”

मोठ्या उपस्थितीचा उत्साह, नेतृत्वाचे संदेश आणि रणनीतीची दिशा या सर्वांसह कार्यकर्ता मेळावा यशस्वी ठरला. आता लक्ष आहे ते भाजप कोअर कमिटीच्या निर्णयाकडे — स्वबळ की महायुती?

निवडणूक समीकरणे बदलण्यासाठी हा निर्णय अत्यंत निर्णायक ठरणार आहे.

---

# प्रारुप मतदार यादीवरील आक्षेपांची गांभिर्याने दखल घ्या

### पिंपरी-चिंचवड आयुक्त श्रावण हर्डीकरांचा निर्देश; 27 नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रारुप मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट होणा-या संबंधित विधानसभा क्षेत्रांच्या दिनांक १ जुलै २०२५ अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीवरुन महानगरपालिकेची प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी गुरुवारी २० नोव्हेंबर २०२५ रोजी मतदार यादी कक्ष तसेच आठ क्षेत्रीय कार्यालयात आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती सूचना आणि आक्षेपांची गांभिर्याने दखल घ्यावी असे निर्देश निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले आहे.**



आठ प्रभागांकरिता स्वतंत्र उप आयुक्त नियुक्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांच्यासह स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, उप आयुक्त पंकज पाटील, डॉ. प्रदिप ठेंगल, संदिप खोत, सिताराम बहुरे, चेतना केरुरे, सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच प्रारुप मतदार यादी हरकत व सूचना कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रारुप मतदार यादीवर हरकती आणि सूचना तसेच आक्षेप घेण्यासाठी नागरिक येत आहेत. या हरकतींची संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांनी स्वत: तपासणी करुन पडताळणी करावी. तसेच या हरकतींवर निर्णय घेण्यासाठी आठ क्षेत्रीय कार्यालयाकरीता स्वतंत्रपणे एक उप आयुक्त नियुक्त करण्यात आला आहे. त्यांनी मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा निपटारा करावा. तसेच हरकत दाखल करण्यासाठी आलेल्या नागरिक तसेच पदाधिका-यांचे म्हणणे व्यवस्थितपणे ऐकून घ्यावे. संवेदनशीलतेने सर्व प्रक्रिया हाताळताना राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले.

**तक्रारी लेखी स्वरूपात द्याव्या लागणार**

हरकत सूचना दाखल करण्यासाठी निवडणूक मतदार यादी कक्ष, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या मागे, पहिला मजला, मुंबई-पुणे रस्ता पिंपरी या ठिकाणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच अ क्षेत्रीय कार्यालय (भेळ चौक, निगडी, प्राधिकरण निगडी), ब क्षेत्रीय कार्यालय (पिंपरी लिंक रोड, एल्प्रो मॉलच्या मागे, चिंचवडगाव), क क्षेत्रीय कार्यालय (नेहरूनगर, पॉलीग्रास ग्राऊंडजवळ, एम.आय.डी.सी. भोसरी), ड क्षेत्रीय कार्यालय (औंध-रावेत रोड, रहाटणी), इ क्षेत्रीय कार्यालय (ग्रोथलॅब इमारत, पांजरपोळ समोर, पुणे-नाशिक रोड, भोसरी), फ क्षेत्रीय कार्यालय (नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाची जुनी इमारत, लोकमान्य टिळक चौक, निगडी), ग क्षेत्रीय कार्यालय (तिसरा मजला, ग क्षेत्रीय कार्यालय, नविन प्रशासकिय इमारत, दिलिप वेंगसरकर क्रिकेट अकॅडमी मागे, थेरगाव), ह क्षेत्रीय कार्यालय (मुलींचे आय.टी.आय. प्रशिक्षण केंद्र, कासारवाडी) या ठिकाणी कक्ष कार्यान्वीत करण्यात आला आहे.

प्रारुप मतदार यादीवर मतदारांनी आपल्या हरकती अथवा सूचना २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत उपरोक्त नमूद कार्यालयात राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या ‘नमुना-अ’ व ‘नमुना-ब’ मध्ये कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात व योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

पुराव्याशिवाय व विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही.

### आठ अधिकारी छाननी करणार

दरम्यान प्रारुप मतदार यादीवर प्राप्त होणा-या हरकती व सूचनांची छाननी करुन निर्णय घेण्यासाठी आठ क्षेत्रीय कार्यालयनिहाय उप आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे. यामध्ये पंकज पाटील (अ क्षेत्रीय कार्यालय), व्यंकटेश दुर्वास (ब क्षेत्रीय कार्यालय), डॉ. प्रदिप ठेंगल (क क्षेत्रीय कार्यालय), चेतना केरुरे (ड क्षेत्रीय कार्यालय), राजेश आगळे (इ क्षेत्रीय कार्यालय), सिताराम बहुरे (फ क्षेत्रीय कार्यालय), आण्णा बोदडे (ग क्षेत्रीय कार्यालय), संदिप खोत (ह क्षेत्रीय कार्यालय) यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.


# दहशतवादाचे 'डॉक्टर'




## भूमिका

**लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ घडवून आणलेल्या भीषण स्फोटापूर्वी उच्चशिक्षितांचे दहशतवादी मॉड्यूल उघड झाले होते. या स्फोटाचा कट, त्यातील वीसहून अधिक डॉक्टरांचा उघड झालेला सहभाग या साऱ्या बाबी चक्रावून टाकणाऱ्या आहेतच; त्या सावध करणाऱ्याही आहेत. या दहशतवाद्यांना स्थानिकांचा मिळणारा आश्रय, मदत आणि रसद याही तितक्याच गंभीर बाबी.**

फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठासारख्या सुरक्षित ठिकाणाहून कटाची सूत्रे हलवली जात होती. फरिदाबाद येथून ९ आणि १० नोव्हेंबर रोजी अटक केलेल्या डॉ. मुझम्मिल गनी याच्या घरातून जम्मू-काश्मीर पोलिसांनी हा साठा जप्त केला होता. स्फोटाची मुळे दूरवर पोहोचली असून, स्फोटातील कारचालक डॉ. उमर नबी याच्या परिचयाच्या अल-फलाह विद्यापीठांमधील दोन डॉक्टर तसेच पठाणकोट येथून एका डॉक्टरसह चारजणांना ताब्यात घेण्यात आले. पाकिस्तानमध्ये किस्तानमध्ये लोकशाही केवळ देखाव्यापुरती आहे. तिथे नुकतीच २७ वी घटनादुरुस्ती करून जवळपास लष्करशाहीच आणण्यात आली. लष्कराचे नियंत्रण सरकारकडे असेल, राष्ट्राध्यक्ष तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख असतील, अशी तरतूद घटनेच्या २४३ व्या कलमात होती. परंतु घटनादुरुस्ती केली गेली आणि या तरतुदी बाद करत, 'चीफ





ऑफ डिफेन्स स्टाफ' हे नवीन पद असीम मुनीर यांच्यासाठी निर्माण करण्यात आले. अण्वस्त्र यंत्रणेची सूत्रेदेखील सरकारच्या किंवा संसदेच्या हातात होती, ती काढून मुनीर यांच्या हातात देण्यात आली. न्यायालयाचे अधिकारदेखील कमी केले गेले. मुनीर कट्टर भारतद्वेषी. यापूर्वी भारतावर लष्करी वा अण्वस्त्र हल्ले करण्याची धमकी त्यांनी दिलेली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागे मुनीर यांचाच मेंदू होता, हे उघड झाले. 'ऑपरेशन सिंदूर 'नंतरदेखील त्यांच्या भारतविरोधी कुरापती चालूच आहेत. दिल्ली स्फोटावरून ते स्पष्ट झाले. लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ घडवून आणलेल्या भीषण स्फोटापूर्वी उच्चशिक्षितांचे दहशतवादी मॉड्यूल उघड झाले होते. या स्फोटाचा कट, त्यातील वीसहून अधिक डॉक्टरांचा उघड झालेला सहभाग या साऱ्या बाबी चक्रावून टाकणाऱ्या आहेतच; त्या सावध करणाऱ्याही आहेत. या दहशतवाद्यांना स्थानिकांचा मिळणारा आश्रय, मदत आणि रसद याही तितक्याच गंभीर बाबी. हरियाणातील फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठासारख्या सुरक्षित ठिकाणाहून कटाची सूत्रे हलवली जात होती. फरिदाबाद येथून ९ आणि १० नोव्हेंबर रोजी अटक केलेल्या डॉ. मुझम्मिल गनी याच्या घरातून जम्मू-काश्मीर पोलिसांनी हा साठा जप्त केला होता. स्फोटाची मुळे दूरवर पोहोचली असून, स्फोटातील कारचालक डॉ. उमर नबी याच्या परिचयाच्या अल-फलाह विद्यापीठांमधील दोन डॉक्टर तसेच पठाणकोट येथून एका डॉक्टरसह चारजणांना ताब्यात घेण्यात आले. तपास यंत्रणांनी पंजाबच्या पठाणकोट येथूनही एका ४५ वर्षीय डॉक्टरला हरियाणातील नूह जिल्ह्यातून दिनेश ऊर्फ डब्बू याला परवान्याशिवाय खते विकल्याबद्दल ताब्यात घेतले आहे. याच नूह येथे काही वर्षांपूर्वी दंगल झाली होती. पठाणकोट येथील अटकेत असलेला डॉक्टर हरियाणातील अल-फलाह विद्यापीठात पूर्वी काम करत होता. अल-फलाह विद्यापीठ आजवर अनेक कारणांनी चर्चेत आले आहे. जावेद सिद्दीकी विद्यापीठाचे संस्थापक असून, करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबद्दल ते तीन वर्षे जेलयात्रा करून आले आहेत. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने या विद्यापीठातील चार डॉक्टरांची वैद्यकीय नोंदणी रद्द केली आहे. यापैकी डॉ. रईस अहमद भट याला ताब्यात घेतले आहे. तपास यंत्रणांना मिळालेल्या माहितीनुसार, हा आत्मघातकी स्फोट घडवणाऱ्या डॉ. नबीबरोबर तो संपर्कात होता. जैश-ए-मोहम्मद आणि अनसार गझवात-उल-हिंद या दोन संघटनांनी हे व्हाईट कॉलर मॉड्यूल तयार केले होते. नूहमधील दोन डॉक्टर्स, त्याचप्रमाणे खत व बी-बियाण्यांच्या विक्रेत्यांनाही ताब्यात घेऊन त्यांची उलटतपासणी घेतली जात आहे. विद्यापीठाच्या काही आजी-माजी विद्यार्थ्यांचीही चौकशी सुरू आहे. गरिबी आणि बेकारी या समस्यांमुळे जम्मू-काश्मीरमधील तरुण दहशतवादाकडे वळले, असा सिद्धांत मांडला जात होता. परंतु हा सिद्धांत अनेकवेळा खोटा ठरला आहे.

## असे कसे?

### तुतानखामेनचा मृत्यू


*शिवाजी महाराजांना गुडघी रोगानं मृत्यू आला असं इतिहास आपल्याला सांगतो*

आपण मृतदेहाचं दहन करतो, दफन करत नाही. त्यामुळे त्या देहाचे अवशेष मिळण्याची कोणतीही शक्यता राहत नाही. पाश्चात्त्य देशांमध्ये दफनाला पसंती दिली जाते. त्यामुळे अस्थींच्या रूपामध्ये का होईना, मृतदेहाचे अवशेष मिळू शकतात. त्यांची परीक्षा करून काही निदान करण्याची शक्यता उरते. तरीही त्या दफन केलेल्या देहाचं उत्खनन केलं तरी केवळ हाडांचा सापळाच हाती लागतो. त्यावरून निदान करण्याची शक्यताही मर्यादित असते. पण इजिप्तमधल्या फॅरोंच्या राजवटीत मृतदेहाचं दफन करण्यापूर्वी त्यांची ममी बनवून तो देह जतन करण्याची प्रथा होती. त्यामुळे मरणानंतरची तपासणी अधिक सविस्तर होऊ शकते. तुतानखामेन हा प्राचीन इजिप्तचा एक राजा केवळ १९ व्या वर्षी मरण पावला. त्याची ममी करून ती त्या वेळच्या प्रथेप्रमाणे पिरॅमिडमध्ये पुरण्यात आली. त्या ममीचा शोध विसाव्या शतकात लागला तेव्हा जगभर त्याचा गाजावाजा झाला.

**अस्पृश्यता हा भारतीय समाजातील सर्वात घातक सामाजिक रोग आहे. शतकानुशतकांपासून धार्मिक व वर्णव्यवस्थेच्या नावाखाली निर्माण झालेल्या या विषमतेने भारतीय समाजाचे केवळ तुकडे तुकडे करून टाकले नाहीत, तर मानवी एकतेलाच खीळ घातली.**

# अस्पृश्यता निवारणाचा इतिहास

या विषमतेच्या विरोधात महाराष्ट्रात अनेक थोर समाजसुधारकांनी क्रांतिकारी आवाज उठवला आणि एका दीर्घ संघर्षातून अस्पृश्यतेविरुद्धची लढाई पुढे सरकली. या लढ्याची सुरुवात महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रबोधनातून झाली आणि अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाधारित चळवळीत ती परिपूर्णतेला गेली. परंतु या दरम्यान अनेक समाजसुधारक, धर्मप्रवर्तक, विचारवंत आणि क्रांतीशील कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या स्तरावर अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रातील या महान परंपरेचा मागोवा घेताना आपण एका व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेकडे पाहतो, ज्यात धर्म, शिक्षण, सामाजिक संघटन आणि राजकीय दृष्टिकोन यांचा मिलाप दिसतो. महात्मा जोतीराव फुले हे अस्पृश्यता निवारणाच्या विचारांचे आद्य पुरस्कर्ते होते. त्यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' यांसारख्या ग्रंथांतून



ब्राह्मण्यवादी धर्मरचनेवर टीका केली आणि समाजातील खालच्या घटकांना शिक्षण, स्वाभिमान आणि संघटनाद्वारे उभे राहण्याचे आवाहन केले. पुण्यात 'सत्यशोधक समाज' स्थापन करून त्यांनी अस्पृश्यतेच्या मुळावर घाव घातला. त्यांनी दलित, शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया या सर्वांना शिक्षण आणि समान वागणूक मिळावी म्हणून शाळा उघडल्या. त्यांच्या विचारांनी पुढील पिढीतील सुधारकांना दिशा दिली. सावित्रीबाई फुले यांनीही बालिकांना शिक्षण देऊन या चळवळीला मानवी मूल्यांचा पाया दिला. फुले यांचा दृष्टिकोन समाजक्रांतीचा होता. त्यांनी धर्माला सामाजिक नैतिकतेच्या कसोटीवर तपासले आणि जेथे धर्म अन्यायाला पोसतो तिथे त्याला आव्हान दिले. फुले यांच्यानंतर अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यात गोपाळबुवा वलंगकर हे एक महत्त्वाचे नाव आहे. ते मूळचे सैनिक असले तरी नंतर त्यांनी समाजसुधारणेचा मार्ग स्वीकारला. त्यांनी 'विवेकविलास' हे नियतकालिक काढून अस्पृश्यतेविरुद्ध लेखन सुरू केले. वलंगकरांनी अस्पृश्यांना 'हरिजन' किंवा 'आत्मबंधू' म्हणत समानतेचा विचार मांडला आणि सामाजिक एकतेचा प्रचार केला. त्यांनी 'असहिष्णुता निर्मूलन' आणि 'जातिभेद निर्मूलन' हे सामाजिक अभियान म्हणून उभे केले. वलंगकरांच्या प्रेरणेतून अनेकांनी या चळवळीत सहभाग घेतला. शिवराम जनाबा कांबळे हे सुद्धा एक लढाऊ कार्यकर्ते होते. ते अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणासाठी झटले आणि पुणे-मुंबईसारख्या ठिकाणी त्यांनी वसतिगृहे चालवली. कांबळे यांनी 'सर्वजनहिताय' या तत्त्वावर आधारित कार्य केले आणि अस्पृश्य समाजाला स्वावलंबनाचे बळ दिले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

शिंदेंचे ३५ आमदार फुटणार?

फडणवीसांच्या नार्को टेस्टची मागणी

# भाजपाचा नेता ठाकरे गटात!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना शिवसेना ठाकरे गटाने भाजपाला मोठा धक्का दिला... 'एकनाथ शिंदेंनी पेरले तेच उगवले ऑपरेशन लोटसमध्ये शिंदे गटाचे ३५ आमदार फुटणार', असा दावा शिवसेनेच्या सामना मुखपत्रातून करण्यात आला... भीमशक्ती आणि शिवशक्तीची युती सत्तेसाठी नव्हे तर न्यायासाठी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले... रत्नागिरीत शिंदेसेनेचा नगराध्यक्ष निवडून जरी आला तरी पुन्हा पोट निवडणूक लागणार, असा दावा भाजपाच्या जिल्हाध्यक्षांनी केला.**

## भीमशक्ती-शिवशक्तीची युती



राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला. डोंबिवलीतील भाजपा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष योगेंद्र भोईर व त्यांच्या पत्नी ट्विंकल भोईर यांनी आज शिवसेना ठाकरे गटात जाहीर प्रवेश केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. योगेंद्र भोईर हे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे निकटवर्तीय मानले जातात. आगामी काळात कल्याण-डोंबिवली महापालिकेची निवडणूक होणार आहे. त्याआधीच भोईर दाम्पत्याने ठाकरे गटात प्रवेश केल्याने भाजपाला हा मोठा धक्का मानला जात आहे. या पक्षप्रवेश कार्यक्रमाच्या वेळी ठाकरे नेते विनायक राऊत, उपनेते संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत, जिल्हाप्रमुख तात्यासाहेब माने, डोंबिवली शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राज्यातील सत्ताधारी महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला आहे. खासदार श्रीकांत शिंदे बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या कल्याण-डोंबिवलीत भाजपाने शिवसेना शिंदे गटाला एकापाठोपाठ एक धक्के देण्यास सुरुवात केली आहे. शहरातील शिंदे गटाचे पदाधिकारी भाजपात प्रवेश करीत आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या भूमिकेमुळे शिंदे गटातील नेत्यांनी नाराजी व्यक्त करीत आहे. त्यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने महायुतीतील नाराजीच्या चर्चेला अधिकच बळकटी मिळाली आहे. यादरम्यान दिल्लीतील भेटीवेळी अमित शाह शिंदेंना यांना जुमानले नाही, अशी टीका ठाकरे गटाचे मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी त्यांच्या ऑपरेशन लोटस या मोहिमेअंतर्गत शिंदे ३५ आमदार फोडणार असल्याचा दावाही अग्रलेखात करण्यात आला आहे. शिंदेंनी जे पेरलंय तेच उगवतंय, असा टोलाही यावेळी लगावण्यात आला आहे. भीमशक्ती आणि शिवशक्तीची युती सत्तेसाठी नव्हे तर फक्त न्यायासाठी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ठाण्यातील मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात शुक्रवारी रिपब्लिकन सेनेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर उपस्थित होते. शिवशक्ती आणि भीमशक्ती पुन्हा एकत्र आल्या हा योगायोग नसून इतिहास घडत आहे.त्या घटनेमुळे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला सुद्धा सर्वोच्च स्थान मिळू शकते, असे शिंदे म्हणाले. ठाण्यात २५ वर्षांपूर्वी आनंद दिघे यांनी भीमशक्ती आणि शिवशक्तीची मुहूर्तमेढ रोवली होती.

## नार्को टेस्टची मागणी

मराठा विरुद्ध ओबीसी, धनगर विरुद्ध आदिवासी, हिंदू विरुद्ध मुस्लीम अशी भांडणे लावून द्वेष पसरवला जात आहे. फडणवीस हेच महाराष्ट्राचे सर्वात मोठे 'आका' असून त्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. पालिका निवडणुकांच्या निमित्ताने सपकाळ यांची आज शनिवारी (दि.२२) परभणी जिल्ह्यातील पाथरी येथे जाहीर सभा झाली.

# राष्ट्रवादीच्या उमेदवारांना खुर्ची दिली नाही

## अजित पवारांचा संताप ते शिवसेना-मनसेच्या युतीबाबत खुलासा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातच आज उपमुख्यमंत्री अजित पवार हे एका कार्यक्रमादरम्यान पक्षाच्या कार्यकर्त्यांवर चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि संघावर जोरदार टीका केली.**

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना आणि पोलिसांना चांगलंच सुनावलं. 'मी सांगतोय, खुर्च्या इथे लावा', असं म्हणत उमेदवारांना मंचासमोर बसण्यासाठी खुर्च्या देण्यास सांगितलं. ते म्हणाले, "उमेदवारांना व्यासपीठावर खुर्च्या द्या." अजित पवारांनी व्यासपीठाच्या समोर व डाव्या बाजूला हाताने इशारा करत सांगितलं की "माझ्या उमेदवारांसाठी इथे खुर्च्या लावा. त्यांना इथे बसवा." अजित पवारांचा अचानक आदेश पाहून काही कार्यकर्ते गोंधळले. त्यावर अजित पवार कार्यकर्त्यांवर संतापून म्हणाले, "द्या ना एकेक खुर्ची त्यांना, मी काय सांगतोय



ते कळत नाय का? इथे खुर्च्या लावा. उमेदवारांना पुढे येऊ द्या." त्यानंतर व्यासपीठावर मागे उभ्या उमेदवारांना अजित पवारांनी पुढे बोलावलं आणि खुर्च्यांवर बसायला सांगितलं.उपमुख्यमंत्री अजित पवार हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना आणि पोलिसांना चांगलंच सुनावलं. 'मी सांगतोय, खुर्च्या इथे लावा', असं म्हणत उमेदवारांना मंचासमोर बसण्यासाठी खुर्च्या देण्यास सांगितलं. दरम्यान, अजित पवार यांचा संतापल्याचा व्हिडीओ शेअर करत अंबादास दानवे यांनी जोरदार टीका केली. दानवे म्हणाले की, "जनतेला गृहीत धरणारे अजितदादा आता पोलिसांनाही आपले कार्यकर्ते समजायला लागले आहेत. निवडणूक तुमची.. सभा तुमची...भाषण तुमचे... उमेदवारही तुमचे... अन् खुर्च्या पोलिसांना लावायला सांगायच्या? ही पोलिसांची ड्युटी आहे का? सांगा..", असं अंबादास दानवे यांनी म्हटलं.जामनेरमध्ये भाजपाकडून नगराध्यक्षपदासाठी मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी साधना महाजन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पण अखेरच्या दिवशी त्यांच्या विरोधात उभ्या असलेल्या तिन्ही उमेदवारांनी माघार घेतली.

## अर्ज मागे घ्यायला भाग पाडलं

रोहित पवार यांनी केला. काही व्हिडीओही त्यांनी शेअर केले. रोहित पवार यांनी म्हटलं आहे की,"भाजपाचे गिरीश महाजन यांच्या जामनेर शहरात दडपशाहीने वंचितसह समविचारी पक्षाच्या उमेदवारांना सत्तेचा गैरवापर करत दडपशाही मार्गाने व बळजबरीने उमेदवारी अर्ज मागे घ्यायला भाग पाडलं गेलं.

**व्हाइट हाऊसमध्ये संवाद**

“आपण एकमेकांबरोबर काम करू शकतो,”

# ट्रम्प यांच्याकडून ममदानींची स्तुती

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूयॉर्क शहराचे नियोजित महापौर जोहरान ममदानी यांनी शुक्रवारी व्हाइट हाऊसमध्ये जाऊन अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. महापौरपदाच्या निवडणुकीत दोन्ही बाजूंनी परस्परांवर टोकाची टीका केली होती. मात्र, शुक्रवारी ओव्हल हाऊसमध्ये झालेल्या भेटीत त्या कडवटपणाचा कोणताही मागमूस नव्हता. “आपण एकमेकांबरोबर काम करू शकतो,” असे या भेटीमध्ये दोन्ही नेत्यांनी जाहीर केले.**

## ममदानी यांची ही पहिलीच भेट




## आमच्या मतभेदांवर लक्ष केंद्रित

तर आपल्याला पुन्हा न्यूयॉर्कला जाण्याची इच्छा होणार नाही अशी टीका त्या शहराचे मूळ रहिवासी असलेल्या ट्रम्प यांनी केली होती. दुसरीकडे, “मतभेद बाजूला सारण्याच्या ट्रम्प यांच्या इच्छेचा आपण आदर करतो,” असे ममदानी म्हणाले.मला वाटले त्यापेक्षा आमच्या दोघांमध्ये बऱ्याच गोष्टी समान आहेत. आमच्या शहराने चांगली कामगिरी करावी, अशी आम्हा दोघांचीही इच्छा आहेमला याचे समाधान आहे की या भेटीत आम्ही आमच्या मतभेदांवर लक्ष केंद्रित केले नाही.

रिपब्लिकन पक्षाचे ७९ वर्षीय नेते ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे ३४ वर्षांचे समाजवादी नेते ममदानी यांची ही पहिलीच भेट होती. त्यांच्यात स्थलांतरापासून आर्थिक धोरणापर्यंत विविध मुद्द्यांवर टोकाचे मतभेद आहेत. मात्र, ही भेट अतिशय सौहार्दपूर्ण होती. त्यांनी एकमेकांकडे पाहून स्मितहास्य केले, एकमेकांची प्रशंसा केली आणि न्यूयॉर्कमधील गुन्हेगारी व महागाई या मुद्द्यांवर परस्परांशी सहकार्य करण्याचा निर्धार केला. ममदानी ट्रम्प यांच्या टेबलाजवळ उभे होते, यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना ट्रम्प यांनी ममदानी यांचा हातही थोपटला. या भेटीची दृश्ये आणि ट्रम्प व ममदानी यांचा संवाद समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाला.“ममदानी महापौर म्हणून जितकी चांगली कामगिरी करतील तितका मला आनंद होईल,” असे ट्रम्प म्हणाले. इतकेच नाही तर, ममदानी न्यूयॉर्कचे महापौर असताना आपल्याला त्या शहरात पुन्हा जायला आवडेल असेही त्यांनी सांगितले. निवडणुकीच्या वेळी, ममदानी विजयी झाले तर आपल्याला पुन्हा न्यूयॉर्कला जाण्याची इच्छा होणार नाही अशी टीका त्या शहराचे मूळ रहिवासी असलेल्या ट्रम्प यांनी केली होती. दुसरीकडे, “मतभेद बाजूला सारण्याच्या ट्रम्प यांच्या इच्छेचा आपण आदर करतो,” असे ममदानी म्हणाले.मला वाटले त्यापेक्षा आमच्या दोघांमध्ये बऱ्याच गोष्टी समान आहेत. आमच्या शहराने चांगली कामगिरी करावी, अशी आम्हा दोघांचीही इच्छा आहेमला याचे समाधान आहे की या भेटीत आम्ही आमच्या मतभेदांवर लक्ष केंद्रित केले नाही. तर न्यूयॉर्कवासीयांसाठी आम्ही काय करू शकतो यावर आम्ही चर्चा केली.यावेळी पत्रकारांनी जोहरान यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतः ट्रम्प यांनी दिली. ममदानी यांनी ट्रम्प यांचा उल्लेख ‘फॅसिस्ट’ असा केला होता. त्याबद्दल त्यांना प्रश्न विचारले असता, “असू दे, ठीक आहे,” असे म्हणत ममदानी यांची पाठराखण केली. “तुम्ही ममदानींना अजूनही जिहादी मानता का,” असा प्रश्न दुसऱ्या पत्रकाराने विचारला असता, “नाही मला आता तसे वाटत नाही,”

असे उत्तर ट्रम्प यांनी दिले. रिपब्लिकन पक्षाचे ७९ वर्षीय नेते ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे ३४ वर्षांचे समाजवादी नेते ममदानी यांची ही पहिलीच भेट होती. त्यांच्यात स्थलांतरापासून आर्थिक धोरणापर्यंत विविध मुद्द्यांवर टोकाचे मतभेद आहेत. मात्र, ही भेट अतिशय सौहार्दपूर्ण होती. त्यांनी एकमेकांकडे पाहून स्मितहास्य केले, एकमेकांची प्रशंसा केली आणि न्यूयॉर्कमधील गुन्हेगारी व महागाई या मुद्द्यांवर परस्परांशी सहकार्य करण्याचा निर्धार केला. ममदानी ट्रम्प यांच्या टेबलाजवळ उभे होते, यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना ट्रम्प यांनी ममदानी यांचा हातही थोपटला. या भेटीची दृश्ये आणि ट्रम्प व ममदानी यांचा संवाद समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाला.“ममदानी महापौर म्हणून जितकी चांगली कामगिरी करतील तितका मला आनंद होईल,” असे ट्रम्प म्हणाले. इतकेच नाही तर, ममदानी न्यूयॉर्कचे महापौर असताना आपल्याला त्या शहरात पुन्हा जायला आवडेल असेही त्यांनी सांगितले. निवडणुकीच्या वेळी, ममदानी विजयी झाले .

# उत्तर प्रदेशात घुसखोरांसाठी बंदिगृहे

## राज्य सरकारचे प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**घुसखोर आणि बेकायदा स्थलांतरितांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावेत, असे निर्देश उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रशासनाला दिले आहेत. यासंबंधी सर्व जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याची माहिती सरकारी प्रवक्त्यांनी शनिवारी दिली.**

घुसखोरांना डांबण्यासाठी राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये तात्पुरती बंदिगृहे उभारण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या असल्याचे सरकारतर्फे प्रसृत करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परदेशी नागरिकत्व असलेल्या बेकायदा घुसखोरांना बंदिगृहांमध्ये ठेवले जाईल, त्यानंतर आवश्यक पडताळणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी माहिती सरकारकडून देण्यात आली. यानंतर प्रस्थापित कार्यप्रणालीनुसार, या घुसघोरांना त्यांच्या मूळ देशात पाठवले जाईल. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, कायदा आणि सुव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा आणि सामाजिक सलोखा याला आपले सर्वोच्च प्राधान्य आहे आणि राज्यात कोणत्याही प्रकारची बेकायदा कारवाई खपवून घेतली जाणार नाही, अशी मुख्यमंत्र्यांची भूमिका आहे.



उत्तर प्रदेश आणि नेपाळदरम्यान खुली सीमा आहे. त्याच्या माध्यमातून दोन्ही देशांतील नागरिकांना एकमेकांच्या देशात मुक्त प्रवेश आहे. घुसखोर याच मार्गाचा वापर करून भारतात येत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.घुसखोर आणि बेकायदा स्थलांतरितांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावेत, असे निर्देश उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रशासनाला दिले आहेत. यासंबंधी सर्व जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना

## कारवाई खपवून घेतली जाणार नाही

आणि राज्यात कोणत्याही प्रकारची बेकायदा कारवाई खपवून घेतली जाणार नाही, अशी मुख्यमंत्र्यांची भूमिका आहे. उत्तर प्रदेश आणि नेपाळदरम्यान खुली सीमा आहे.

त्याच्या माध्यमातून दोन्ही देशांतील नागरिकांना एकमेकांच्या देशात मुक्त प्रवेश आहे. घुसखोर याच मार्गाचा वापर करून भारतात येत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

सूचना देण्यात आल्याची माहिती सरकारी प्रवक्त्यांनी शनिवारी दिली. भारण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या असल्याचे सरकारतर्फे प्रसृत करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परदेशी नागरिकत्व असलेल्या बेकायदा घुसखोरांना बंदिगृहांमध्ये ठेवले जाईल, त्यानंतर आवश्यक पडताळणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी माहिती सरकारकडून देण्यात आली. यानंतर प्रस्थापित कार्यप्रणालीनुसार, या घुसघोरांना त्यांच्या मूळ देशात पाठवले जाईल.सरकारने दिलेल्या माहितीनुसार, कायदा आणि सुव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा आणि सामाजिक सलोखा याला आपले सर्वोच्च प्राधान्य आहे.



# भावाच्या वाढदिवशी अपूर्वाच्या डोळ्यात पाणी!

अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर ही नेहमी आपल्या अभिनयाने आणि बिनधास्त स्वभावामुळे चर्चेत असते. 'शेवंता' या भुमिकेपासून ओळखली जाणारी अपूर्वा ही बिग बॉस मराठी नंतर अधिकच प्रसिद्ध झाली. आता अपुर्वा 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेत झळकत आहे. अपूर्वा नेमळेकर ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. काही महिन्यापुर्वी तिच्या सख्ख्या धाकट्या भावाचे अचानक निधन झाले. अपूर्वाच्या लहान भावाचे ओंकार नेमळेकरचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले होते. आज ओंकारचा वाढदिवस आहे. लाडक्या भावाच्या वाढदिवसाला तो आपल्यात नसण्याचं दुःख अपुर्वाने एका पोस्टद्वारे मांडलं आहे. अपूर्वाने भावाच्या वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर भावाचे फोटो शेयर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या पोस्टमध्ये अपुर्वा लिहिते की, दरवर्षी  हा दिवस खूप मजेशीर आणि उत्साहाने भरलेला असायचा. आपल्या बालपणात या दिवशी घरी बनवणाऱ्या केकची तयारी, सजावट आणि वाढदिवसाच्या कपडे अशा अनेक गोष्टी असायच्या !!! आणि जसजसे आम्ही मोठे झालो, तसतसे आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन आणि आपल्या आवडत्या स्वादिष्ट पदार्थांवर ताव मारणे हे सर्व होतं...त्यावेळी खूप मजा यायची !! आपण आपल्या आठवणी साठवत आहोत हे कधीच कळलं नाही... पण देव तूला खूप लवकर घेऊन गेला आणि तुझ्याशिवाय आमचं आयुष्य अपूर्ण आहे. मला आशा आहे की तू स्वर्गातून आमच्याकडे हसतमुखाने पहात असशील कारण आज आम्ही तूझी आठवण नेहमीपेक्षा जास्त जपत आहोत. माझ्या लाडक्या ओम तुझी आठवण काढणं खुप सोपं आहे, मी ते दररोज करतो. ही फक्त तुला गमावण्याची वेदना आहे जी कधीही दूर होत नाही. माझ्या प्रिय भाऊ, तुला वाढदिवसाच्या शुभेच्छा. भविष्यात एक दिवस तू आणि मी पुन्हा एकत्र येऊ. आम्हाला तुमची खूप आठवण येते. मी तुझ्यावर प्रेम करतो माझ्या भावा" अशा शब्दात अपूर्वाने आपल्या लाडक्या भावाला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.सध्या तिची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

## लव्ह लाईफबाबत बोलला सूरज पांचोली

अभिनेता सूरज पांचोली अलिकडेच लव्ह लाईफबद्दल बोलला. समजून घेणाऱ्या व्यक्तीसोबत राहून मला खूप आनंद होत असल्याचे अभिनेत्याने सांगितले. सूरजने सांगितले की, त्याच्या सध्याच्या मैत्रिणीने त्याला जिया खान प्रकरणाबद्दल कधीही विचारले नाही. सूरजने नुकतेच त्याच्या नात्याबद्दल आणि गर्लफ्रेंडबद्दल मोकळेपणाने सांगितले. मात्र, त्याने लेडी लव्हचे नाव उघड केले नाही. सिद्धार्थ कानननला दिलेल्या मुलाखतीत सूरजने सांगितले की, जिया खान प्रकरणातील मीडिया ट्रायलमुळे त्याला अडचणींचा सामना करावा लागला. तर जियासोबतचे त्याचे नाते सर्वात कमी काळ टिकले. संवादादरम्यान सूरजला तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणाबद्दल विचारण्यात आले. या प्रकरणात अभिनेत्रीचा प्रियकर शीझान खानला तिच्या मृत्यूप्रकरणी आरोपी मानले जात होते. या प्रकरणाबाबत बोलताना सूरज म्हणाले-'मीडिया ट्रायल लोकांवरील आरोप ठरवू शकत नाही.' प्रेमाबाबत सूरज म्हणाला- मला असे वाटत नाही, माझा प्रेमावर विश्वास आहे. त्या प्रकरणानंतरही मी प्रेमात पडलो (जिया खान प्रकरण). सूरजला पुढे विचारण्यात आले की तो गेल्या सात वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहे का? आणि त्याच्या गर्लफ्रेंडचा त्याच्यावर किती विश्वास आहे. यावर तो म्हणाला- इतके दिवस नाही, पण मी सध्या रिलेशनशिपमध्ये आहे. आम्ही भूतकाळाबद्दल कधीही बोललो नाही. कदाचित त्याची गरजही नसेल.

## आताच सुधरा नाहीतर...!



महादेव ॲप हे प्रकरण सध्या देशभरात चांगलंच चर्चेत आलं आहे. या प्रकरणामुळे मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध कलाकारदेखील ईडीच्या रडारवर आहेत. ज्यात रणबीर कपूर, कपिल शर्मा, हुमा कुरेशी आणि हिना खान, अमिषा पटेल, श्रद्धा कपूर, सोनाक्षी सिन्हा, इम्रान हाश्मी, बोमन इराणी, कॉमेडियन भारती सिंग आणि नेहा कक्कर यांचा समावेश आहे. ईडीच्या म्हणण्यानुसार या स्टार्सनी या ॲप्सची जाहिरात केली आहे. त्यांच्या प्रमोशनल इव्हेंटमध्येही या कालाकारांचा सहभाग होता. त्यामुळे आता ईडी त्यांची चौकशी करणार आहे. त्यातच आता बॉलिवूडची पंगा क्विन कंगना राणौतचं वक्तव्य चर्चेत आलं आहे. महादेव बेटिंग ॲपच्या प्रमोशनसाठी तिला करोडो रुपयांची ऑफर देण्यात आली होती मात्र कंगनाने ती ऑफर आणि या ॲपची जाहिरात करण्यास नकार दिल्याचा खुलासा केला. इतकच नाही तर आता कंगना रणौतने महादेव ॲप प्रकरणात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवरही निशाणा साधला आहे. कंगना रणौतने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर याबाबच एक पोस्ट शेयर केली आहे. एका बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत कंगना लिहिते की, “हे एंडोर्समेंट मला एका वर्षात जवळपास 6 वेळा आलं, प्रत्येक वेळी मला खरेदी करण्यासाठीच्या या ऑफरमध्ये अनेक कोटी रुपये जोडले पण मी प्रत्येक वेळी नाही म्हणाले. हा नवा भारत आहे, स्वतःला सुधरवा नाहीतर तुम्हाला वठणीवर आणण्यात येईल." महादेव ॲपमध्ये पोकर, चान्स गेम्स, बॅडमिंटन, टेनिस, फुटबॉल, क्रिकेट आणि कार्ड गेम यांसारख्या अनेक ऑनलाइन गेमवर बेटिंग केली जाते. हे ॲप दुबईचे सौरभ चंद्राकर आणि रवी उरपल चालवत होते. या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव ॲप प्रकरणातील मुख्य आरोपी सौरभ चंद्राकरच्या विवाह सोहळ्यात अनेक कलाकारांनी सहभाग घेतला होता. आता या कलाकारांची चौकशी करण्यात येणार आहे. त्यातच आता कंगना रणौतने महादेव ॲप प्रकरणात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवर निशाणा साधला आहे. महादेव ॲप हे प्रकरण सध्या देशभरात चांगलंच चर्चेत आलं आहे. या प्रकरणामुळे मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध कलाकारदेखील ईडीच्या रडारवर आहेत.

## अभिनेत्री परिणीती चोप्राचे जंगी स्वागत

परिणिती चोप्राच्या लग्नानंतरचा एक व्हिडिओ समोर आला आहे. हा व्हिडीओ तिच्या गृहप्रवेशाचा आहे. चड्ढा कुटुंबाने परिणितीचे मनापासून स्वागत केले आहे. सासरची ही स्टाइल तिला खूप आवडली, त्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. 24 सप्टेंबर 2023 रोजी परिणितीने खासदार राघव चड्ढासोबत लग्न केले. त्यांचा विवाह उदयपूरच्या हॉटेल लीला पॅलेसमध्ये झाला. लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी परिणितीने लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. परिणितीच्या स्वागतासाठी चड्ढा हाऊस फुलांनी आणि दिव्यांनी सजवण्यात आले होते. आरती ओवाळत सासूने त्यांचे स्वागत केले. यादरम्यान कुटुंबीयांनी परिणीती आणि राघव यांना त्यांच्या नात्याबाबत काही प्रश्न विचारले. परिणितीने सांगितले की, तिनेच आधी राघवला प्रपोज केले होते व्हिडिओमध्ये परिणितीचे लग्नानंतरचे सर्व विधी पार पाडल्याचे दिसत आहे. राघवने विधीमध्ये रिंग शोधली. परिणितीचे सासरच्यांसोबतचे सुंदर नातेही पाहायला मिळाले. व्हिडिओच्या शेवटी राघवने सांगितले की, आता परिणीती चड्ढा झाली आहे. तर परिणितीने तिचे सासरचे कुटुंब जगातील सर्वात प्रेमळ कुटुंब असल्याचे वर्णन केले. ती म्हणाली की इथले लोक तिला राणीसारखे वागवत आहेत.



## मराठी अभिनेता हृषिकेश शेलारची पत्नी काय म्हणाली?

अभिनेता हृषिकेश शेलार याने खलनायक व नायक अशा दोन्ही रुपांतून प्रेक्षकांचे भरभरुन मनोरंजन केले. विशेष बाब म्हणजे त्याच्या दोन्ही भूमिकांना प्रेक्षकांचे मोठे प्रेमही मिळाले. हृषिकेश शेलार ‘सुंदरा मनामध्ये भरली’ या मालिकेत खलनायकाच्या भूमिकेत दिसला होता. या मालिकेत त्याने साकारलेली दौलत ही भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडली. त्यानंतर तो झी मराठी वाहिनीवरील ‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आला. या मालिकेत तो प्रमुख भूमिकेत दिसला. नायक म्हणून त्याची ही पहिली मालिका होती.‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ या मालिकेत त्याने अधिपती ही भूमिका साकारली होती. या भूमिकेतून घराघरांत पोहोचला. आईवरचे प्रचंड प्रेम व विश्वास, पत्नीप्रतिचे समर्पण, वडिलांविषयी मनात असलेली कटुता आणि अन्यायाप्रति असलेली चीड अशी ही अधिपतीची भूमिका लोकांना प्रचंड आवडली. मास्तरीणबाई व अधिपती यांच्या केमिस्ट्रीने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली. या मालिकेने नुकताच निरोप घेतला आहे. आता अभिनेता त्याच्या व्यावसायिक आयुष्यामुळे नाही तर त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. अभिनेत्याला लग्नाला आज ८ वर्षे पूर्ण झाले आहे. या निमित्ताने त्याने व त्याच्या पत्नीने त्यांचे काही खास फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आहे. या फोटोंमध्ये त्यांचे वेगवेगळ्यावेगवेगळे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद असलेले फोटो पाहायला मिळत

**इराणच्या आव्हानास सज्ज** | महिला कबड्डी संघाच्या प्रशिक्षक तेजस्विनीचा विश्वास

# इराणच्या आव्हानास सज्ज, विजेतेपद ध्येय!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला कबड्डीतील वर्चस्व सिद्ध करण्यासाठी भारतीय संघ पूर्ण ताकदीने सज्ज आहे. तंत्र, कौशल्य आणि शारीरिक क्षमता या सर्व आघाड्यांवर भारतीय खेळाडू उत्तम कामगिरी करत आहेत. त्यामुळे आमचे ध्येय स्पष्ट आहे, ते म्हणजे विश्वचषक विश्वविजेतेपद! असा ठाम विश्वास भारतीय संघाच्या प्रशिक्षक आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या तेजस्विनी यांनी व्यक्त केला.**

## उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश



ढाका येथे सुरू असलेल्या महिलांच्या दुसऱ्या विश्वचषक कबड्डी स्पर्धेत भारताने चारही साखळी सामने सहज जिंकत उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. भारतीय संघाच्या आतापर्यंतच्या कामगिरीबाबत प्रशिक्षक तेजस्विनी यांनी समाधान व्यक्त केले."साखळीत आम्हाला मोठे आव्हान नव्हते, पण आम्ही कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला कमी लेखण्याची चूक केली नाही. पूर्ण तयारीने आम्ही खेळलो. खेळाडूंची अदलाबदल हा खेळाच्या नियोजनाचा भाग होता. प्रतिस्पर्धी संघाचा खेळ पाहून आम्ही त्यानुसार योजना आखल्या. इराणचेही सर्व सामने पाहिले असून, आम्ही उपांत्य फेरीत त्यांच्याविरोधात सर्वोत्तम कामगिरीसाठी सज्ज असू," असे तेजस्विनी यांनी 'सांगितले.भारतीय संघाच्या चढाया चांगल्या होत आहेत. दोन्ही कोपऱ्यांमध्ये आणि मध्यरक्षकांमध्ये उत्तम समन्वय असून त्यामुळे आम्ही वर्चस्व राखू यात शंका नाही. इराण सातत्याने प्रगती करत आहे, मात्र या वेळेस त्यांच्या चढाईपटूंच्या कामगिरीत सातत्याचा अभाव जाणवतो आणि बचावही कमकुवत दिसला आहे. अर्थात, आम्ही त्यांना कमी लेखणार नाही. पूर्ण क्षमतेनेच मैदानात उतरणार आहोत. सर्व खेळाडू तंदुरुस्त आहेत, हे सर्वांत महत्त्वाचे," असेही तेजस्विनी म्हणाल्या.भारतीय संघात रितू नेगी, पुष्पा, साक्षी, सोनाली शिंगटे अशा अनुभवी खेळाडूंसह संजू देवी या नव्या खेळाडूनेही लक्ष वेधून घेतले आहे. "राष्ट्रीय स्पर्धेत ती चांगलीच खेळली होती. शिबिरात तिने खूप मेहनत घेतली. ती अतिशय प्रतिभावान खेळाडू असून तिचे भविष्य उज्ज्वल आहे," अशा शब्दांत तेजस्विनी यांनी संजूचे कौतुक केले. दोन विश्वचषक स्पर्धांमध्ये दशकाहून अधिक काळ लोटला आहे. त्यामुळे समोर येणाऱ्या संघांमध्ये बदल झाला आहे. "या वेळी बरेचसे नवखे संघ असले तरी योग्य प्रशिक्षण मिळाल्यास ते येत्या काळात आत्मविश्वासाने मैदानात उभे राहतील," असे तेजस्विनी म्हणाल्या.बांगलादेशात राजकीय आणि सामाजिक तणाव कायम असून याचा सुरक्षेवर आणि स्पर्धेवर काही परिणाम झाला का, असे विचारले असता, "आमचा प्रवास हॉटेल आणि मैदान यापुरताच मर्यादित आहे. सुरक्षाव्यवस्था चोख आहे, त्यामुळे भीती वाटत नाही," असे तेजस्विनी यांनी सांगितले. सराव चांगला असेल तर कोणतेही आव्हान सहज पेलता येते. आमचा सराव उत्कृष्ट झाला आहे आणि सर्व खेळाडू मेहनत घेत आहेत. त्यामुळे विजयाची आम्हाला खात्री आहे. महिला कबड्डीतील वर्चस्व सिद्ध करण्यासाठी भारतीय संघ पूर्ण ताकदीने सज्ज आहे. तंत्र, कौशल्य आणि शारीरिक क्षमता या सर्व आघाड्यांवर भारतीय खेळाडू उत्तम कामगिरी करत आहेत. त्यामुळे आमचे ध्येय स्पष्ट आहे, ते म्हणजे विश्वचषक विश्वविजेतेपद! असा ठाम विश्वास भारतीय संघाच्या प्रशिक्षक आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या तेजस्विनी यांनी व्यक्त केला.ढाका येथे सुरू असलेल्या महिलांच्या दुसऱ्या विश्वचषक कबड्डी स्पर्धेत भारताने चारही साखळी सामने सहज जिंकत उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. भारतीय संघाच्या आतापर्यंतच्या कामगिरीबाबत प्रशिक्षक तेजस्विनी यांनी समाधान व्यक्त केले."साखळीत आम्हाला मोठे आव्हान नव्हते, पण आम्ही कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला कमी लेखण्याची चूक केली नाही. पूर्ण तयारीने आम्ही खेळलो. खेळाडूंची अदलाबदल हा खेळाच्या नियोजनाचा भाग होता. प्रतिस्पर्धी संघाचा खेळ पाहून आम्ही त्यानुसार योजना आखल्या. इराणचेही सर्व सामने पाहिले असून, आम्ही उपांत्य फेरीत त्यांच्याविरोधात सर्वोत्तम कामगिरीसाठी सज्ज असू," असे तेजस्विनी यांनी सांगितले.

### सर्व खेळाडू तंदुरुस्त आहेत

भारतीय संघाच्या चढाया चांगल्या होत आहेत. दोन्ही कोपऱ्यांमध्ये आणि मध्यरक्षकांमध्ये उत्तम समन्वय असून त्यामुळे आम्ही वर्चस्व राखू यात शंका नाही. इराण सातत्याने प्रगती करत आहे, मात्र या वेळेस त्यांच्या चढाईपटूंच्या कामगिरीत सातत्याचा अभाव जाणवतो आणि बचावही कमकुवत दिसला आहे. अर्थात, आम्ही त्यांना कमी लेखणार नाही. पूर्ण क्षमतेनेच मैदानात उतरणार आहोत. सर्व खेळाडू तंदुरुस्त आहेत, हे सर्वांत महत्त्वाचे," असेही तेजस्विनी म्हणाल्या.

# गिल एकदिवसीय मालिकेलाही मुकणार?

## मानेच्या दुखापतीने त्रस्त; कर्णधारपदासाठी राहुल, पंतमध्ये स्पर्धा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मानेच्या दुखापतीमुळे कर्णधार शुभमन गिल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेलाही मुकण्याची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील (बीसीसीआय) सूत्रांकडून देण्यात आली. त्याच्या अनुपस्थितीत ऋषभ पंत आणि केएल राहुल या यष्टिरक्षक-फलंदाजांपैकी एकाकडे नेतृत्वाची धुरा सोपवली जाऊ शकते, असे समजते.**



मानेच्या दुखापतीमुळे गिलला विश्रांतीची आवश्यकता असून भारतीय संघ व्यवस्थापन त्याला खेळविण्याची घाई करणार नाही. कोलकाता कसोटीत जायबंदी झालेल्या गिलला गुवाहाटी येथे शनिवारपासून सुरू झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याला मुकावे लागले. गिल सध्या मुंबईत असून त्याच्या वैद्यकीय चाचण्या करण्यात येत आहेत.

"दुखापतीचे स्वरूप आणि ती किती गंभीर आहे,

हे स्पष्ट होण्याकरिता आवश्यक चाचण्या करण्यात आल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी तो तंदुरुस्त होण्याची अपेक्षा निवड समितीला आहे,"

असे सूत्राने सांगितले. एकदिवसीय मालिकेसाठी गिलच्या अनुपस्थितीत यशस्वी जैस्वालला रोहित शर्माच्या साथीने सलामीची खेळण्याची संधी मिळू शकेल. अभिषेक शर्माचा राखीव सलामीवीर म्हणून विचार केला जाऊ शकतो. एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना ३० नोव्हेंबरला रांची येथे होणार आहे.

हर्षित राणा, मोहम्मद सिराज आणि अर्शदीप सिंग वेगवान गोलंदाजांची जबाबदारी पार पाडतील.कसोटी मालिकेनंतर जसप्रीत बुमराला विश्रांती दिली जाऊ शकते.

### राहुलला पसंती?

प्रारूपातच खेळण्याची शक्यता आहे. कुलदीप यादव वैयक्तिक कारणामुळे मालिकेत खेळणार नाही. फिरकीची धुरा अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्यावर असेल.गुवाहाटी येथे शनिवारपासून सुरू झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी गिल उपलब्ध नसल्याने कर्णधारपदाची जबाबदारी ऋषभ पंतने सांभाळली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार।

। दि. 23 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## लंडनमध्ये ‘डी. वाय. पाटील अभियांत्रिकी’च्या

# माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा; 45 माजी विद्यार्थी एकत्र!

### जुन्या आठवणी, अनुभवांची देवाणघेवाण आणि जागतिक पातळीवर संस्थेचा ‘ब्रँड’ मजबूत करण्याचा संकल्प

। पिंपरी चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कसबा बावडा येथील डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा लंडनमधील पार्क प्लाझा व्हिक्टोरिया येथे उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. परदेशात करिअर घडवलेल्या ४५ माजी विद्यार्थ्यांनी एकाच छताखाली एकत्र येत महाविद्यालयीन दिवसांच्या आठवणींना नव्याने उजाळा दिला.**



या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून मूळचे गडहिंग्लजचे आणि सध्या लंडनमध्ये ‘कोका-कोला’ कंपनीचे संचालक म्हणून कार्यरत असलेले राजेश महाजन उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करताना त्यांनी आपल्या प्रवासाचा अनुभव सांगितला. “महाविद्यालयातील शिक्षण व संस्कारांमुळे मला आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली. आज माझे सहाध्यायी विविध देशांत प्रतिष्ठित पदांवर आहेत, हीच संस्थेची मोठी ताकद आहे,” असा अभिमान व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील मार्गदर्शन केले.

#### “माजी विद्यार्थीच संस्थेचे खरे ब्रँड ॲम्बेसिडर” — डॉ. संजय पाटील

मेळाव्याच्या प्रमुख सत्रात डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले,

“संस्थापक डॉ. डी. वाय. पाटील यांनी १९८४ मध्ये दूरदृष्टीने शिक्षणसंस्था उभारल्या. आज आमचे विद्यार्थी जगभरातील तंत्रज्ञान, संशोधन, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात आपली छाप पाडत आहेत. ही केवळ संस्थेची नाही तर महाराष्ट्राची अभिमानाची बाब आहे. माजी विद्यार्थी ही आमची खरी शक्ती आणि ओळख आहेत.”

त्यांनी पुढे सांगितले की आगामी काळात संस्था आणि माजी विद्यार्थ्यांचे नाते अधिक मजबूत करण्यासाठी विविध कार्यक्रम, शिष्यवृत्ती योजना व ग्लोबल नेटवर्क तयार करण्यात येणार आहे.

#### मेळाव्यात विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती आणि मनोगत

कार्यक्रमात चेतन ओझा, मेनका भारद्वाज, संदीप पाटील, ऋषिकेश देशपांडे, प्रीती रणभिसे, ऋतुजा पाटील आणि निकेत साबळे यांसारख्या माजी विद्यार्थ्यांनी आपला व्यावसायिक प्रवास, आव्हाने आणि प्रेरणा शेअर केली. अनेकांनी महाविद्यालयाने दिलेल्या तांत्रिक प्रशिक्षणासोबतच मानवी मूल्ये आयुष्यभर उपयोगी ठरल्याचे सांगितले.

#### कार्यक्रमाचे संयोजन सुत्रबद्ध व आकर्षक

मेळाव्याचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव नरके यांनी केले. केमिकल विभाग प्रमुख डॉ. के. टी. जाधव यांनी स्वागत केले, तर संचालक डॉ. अजित पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. या मेळाव्याचे संयोजन माजी विद्यार्थी समन्वयक डॉ. मनीषा भानुसे, साईदत्त सबनीस आणि अरिहंत आडके यांनी केले.

#### भावनिक संदेशाने कार्यक्रमाचा समारोप

मेळाव्याचा समारोप करताना डॉ. संजय पाटील म्हणाले, “माजी विद्यार्थी हा आमच्या संस्थेचा सर्वात मोठा गौरव आहे. जगात कुठेही गेल्यावर त्यांचा यशस्वी ठसा दिसला की संस्थेचे कार्य खरे ठरते.” हसत-खेळत, फोटोसेशन आणि नेटवर्किंग सत्रानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. पुढील वर्षी अधिक मोठ्या प्रमाणावर जागतिक स्तरावर महा-स्नेहमेळावा आयोजित करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

लंडनमध्ये झालेला हा मेळावा “एकत्र आलो, आठवलो आणि पुढे जोडले गेलो” असा संस्मरणीय ठरला.

# ‘जनतेचा विश्वास-विकासाचा प्रवास’!

### माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे : पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टतर्फे मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड महानगरपालिकेचे प्रथम महापौर, हवेली तालुक्याचे माजी आमदार, तसेच पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि पवना सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या सांभाळणारे माननीय ज्ञानेश्वर लांडगे यांचा वाढदिवस काल उत्साहात साजरा करण्यात आला.**



> जनतेचा विश्वास हीच माझी खरी शक्ती आहे. विकासाच्या प्रत्येक पावलामागे तुमचा पाठिंबा आहे, आणि तोच मला सतत नवी ऊर्जा देतो.– ज्ञानेश्वर लांडगे, माजी आमदार.

या निमित्त पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टतर्फे त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व विकासकामातील योगदानाबद्दल भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात लांडगे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आभार व्यक्त करताना आमदार लांडगे म्हणाले, “जनतेचा आशिर्वाद आणि विश्वास हीच माझी ताकद आहे. विकासाची गती अधिक वेगाने वाढवण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील.”या प्रसंगी पद्माताई भोसले, विठ्ठल शेठ काळभोर शांताराम गराडे, पद्माताई भोसले, नरेंद्र लांडगे अजिंक्य काळभोर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी लांडगे यांच्या कार्यशैलीचे आणि जनसेवेसाठीच्या बांधिलकीचे कौतुक केले.

## 86 जणांनी रक्तदान करून दिला मानवतेचा संदेश

# प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमध्ये समाजसेवेचा आदर्श!

### विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; रक्तदानाद्वारे सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षण क्षेत्रासोबत समाजसेवेची मूल्ये जोपासणाऱ्या प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमध्ये गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचा उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला. समाजहितासाठी दिलेल्या या उपक्रमात ८६ जणांनी स्वेच्छेने रक्तदान करून माणुसकीचा आदर्श घालून दिला.**




हे रक्तदान शिबिर प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या एमबीए आणि एमसीए विभागाने आयोजित केले होते. संस्थेचे मार्गदर्शन कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा आणि संस्थेच्या संचालिका डॉ. तेजल शहा यांनी केले. शिबिराचे उद्घाटन एमबीए विभागाचे संचालक डॉ. सचिन बोरगांवे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनानंतर रक्तदात्यांचे सत्कार करण्यात आले आणि त्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण झाले.

#### सामाजिक बांधिलकीची जाणीव — विद्यार्थ्यांची अभिमानास्पद सहभाग

रक्तदानासाठी विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्ती दाखवली, तर अनेकांनी प्रथमच रक्तदान करून समाजसेवेची पायरी चढली. "रक्तदान म्हणजे केवळ दान नव्हे तर जीवदान" हा संदेश विद्यार्थ्यांनी कृतीतून साकारला असल्याचे आयोजकांनी नमूद केले.

#### उपक्रम यशस्वी करण्यासाठी टीमचे परिश्रम

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मनीष पाटणकर, प्रा. गुरुराज डांगरे, प्रा. अश्विनी जोशी, प्रा. तुलिका चतर्जी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराचे समन्वयक म्हणून प्रा. दत्तात्रय येवले यांनी काम पाहिले. विद्यार्थी प्रतिनिधी कृष्णन पाटील आणि वैभव महाजन यांनी रक्तदान प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. रक्तसंकलन आणि वैद्यकीय तपासणीसाठी मोरया ब्लड सेंटरच्या टीमचे नेतृत्व डॉ. प्रक्षाली गांधी यांनी केले.

#### उत्साह, भावनात्मकता आणि जबाबदारीची जाणीव

रक्तदान शिबिर यशस्वी झाल्यानंतर आयोजकांनी व्यक्त केलेल्या भावना विशेष होत्या. त्यांनी सांगितले, "विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि मदतभाव अशी संस्कृती रुजवणे हाच आमचा उद्देश आहे. आज विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया पाहून आमचे प्रयत्न योग्य दिशेने जात असल्याचे समाधान वाटते."

प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटने फक्त शिक्षण नाही तर समाजासाठी काम करणारे जबाबदार विद्यार्थी घडवण्याचे ध्येय आचरणात आणले. ८६ रक्तदात्यांच्या सहभागाने हा उपक्रम अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी ठरला असून पुढील काळात अशा सामाजिक उपक्रमांची संख्या वाढवण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.

---

# जेजुरीगडावर चंपाषष्ठी महोत्सवात हरिद्रा मार्चन पूजन

### हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; खंडोबाच्या मंदिरात 'शिवमल्हार' नामजपाने दुमदुमला गड

। पुरंदर।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय लोकदैवत भगवान खंडोबा यांच्या चंपाषष्ठी महोत्सवाचा धार्मिक उत्साह शिखरावर पोहोचला असून शनिवार दि. २२ रोजी जेजुरी गडावर झालेल्या हरिद्रा मार्चन पूजनाला हजारो महिलाभक्तांनी उपस्थित राहून भावपूर्ण सहभाग नोंदवला. पारंपरिक वेशभूषा, हातात हळदीची पुडी आणि ओठावर "शिवमल्हार" नामगर्जना करत झालेल्या या मिरवणुकीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.**



पौराणिक परंपरेनुसार नवरात्राप्रमाणेच षडोरात्र साजरा होणारा चंपाषष्ठी उत्सव हा जेजुरीतील प्रमुख धार्मिक सोहळा मानला जातो. यंदाचा हरिद्रा मार्चन कार्यक्रम मार्तंड देवस्थान आणि हडपसर येथील ज्ञानयोग प्रतिष्ठान सेवा ट्रस्टच्या अध्यक्षा मनीषाताई खेडकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. मल्हार सहस्त्रनाम पठण, भंडारा पूजन आणि सामूहिक स्तोत्र पठणामुळे वातावरण शंकरस्वरुप खंडोबा भक्तीने भारून गेले.

उदयकाली गुरव, पुजारी, मानकरी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आरतीनंतर कार्यक्रमाला औपचारिक सुरुवात झाली. मंदिर परिसरात लोकवाद्यांच्या गजरात आणि संबळ वादनाच्या तालावर महिलांनी हळदीची उधळण करत धार्मिक मिरवणूक काढली. शिर्डीहून आलेल्या भक्तांनी फुलभंडार्याच्या तोफेने कार्यक्रमाला सलामी दिली.

या पूजनाचे पौरहित्य सदानंद आगलावे गुरुजी आणि शशिकांत सर्वेकरी गुरुजी यांनी केले. चंपाषष्ठीच्या धार्मिक परंपरेचे महत्त्व तसेच हळद पूजन हे खंडोबाप्रती कृतयुगापासून चालत आलेले प्रतीक असल्याचे मार्तंड देवसंस्थानाचे अध्यक्ष मंगेश घोणे आणि आयोजक डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा विना सोनवणे, नगरसेविका सुरेखा सोनवणे, ॲड. पांडुरंग थोरवे, ट्रस्टी जालिंदर खोमणे, प्रसिद्ध दिग्दर्शक दीपक मंदाडे, वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डचे अविनाश सुकुंडे यांसह विविध सखी मंच संघटना व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हारतीनंतर महिलांसाठी विशेष सत्कार कार्यक्रम घेण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम भव्य आणि शिस्तबद्धपणे पार पडण्यासाठी देवस्थान समिती, पोलीस प्रशासन, स्वयंसेवक यांनी विशेष मेहनत घेतली. खंडोबा भक्ती, परंपरा आणि सामूहिक श्रद्धेचा वारसा कायम ठेवत यंदाची चंपाषष्ठी भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

## श्रीकृष्णलीला मायरा कथा सोहळ्याचे भव्य आयोजन

# वाकड परिसर भक्तिरसात रंगणार: राम वाकडकर

## वाकडमध्ये जया किशोरींचा तीन दिवसीय श्रीकृष्णलीला कथा सोहळा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड परिसर भक्तिरसात रंगणार आहे. जगप्रसिद्ध आध्यात्मिक प्रवक्त्या जया किशोरी दीदी यांच्या कंठातून साकार होणाऱ्या तीन दिवसीय श्रीकृष्णलीला मायरा कथा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. अंतरीचा कृष्ण जागवू या, कृष्णमय होऊ या" या भावस्पर्शी संदेशासह हा अध्यात्मिक उत्सव २४ ते २६ नोव्हेंबरदरम्यान सायंकाळी सहा वाजता रंगणार आहे.**






हा सोहळा भाजपा पिंपरी-चिंचवड शहराचे उपाध्यक्ष राम वाकडकर यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून आकार घेत आहे. मुंबई–बंगळूरू महामार्गालगत टीप-टॉप हॉटेलजवळील प्रशस्त जागेत कथा आयोजित केली आहे. प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य असून वाकड, ताथवडे, पुनावळे तसेच आसपासच्या भागातील भाविकांसाठी हा अध्यात्मिक जल्लोष अनुभवण्याची अनोखी संधी आहे. जया किशोरी दीदींच्या सुमधुर वाणीतून होणाऱ्या मायरा कथेने देशभरातील लाखो भक्तांच्या हृदयात कृष्णभक्तीचा झरा निर्माण केला आहे. तीन दिवस भक्तिमय अनुभवाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी कुटुंबासह उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या सोहळ्याला खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण वाकड परिसरात या कार्यक्रमाबद्दल मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.

